सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २५ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ‘अजूनही धडा घेतला नाही...’

## नीट पेपर लीकवर एनटीए ला फटकारत सुप्रीम कोर्टाची केंद्र आणि सीबीआय ला नोटीस




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५नवी दिल्ली –** सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (२५ मे) नीट-यूजी २०२६ परीक्षेसंदर्भातील एका याचिकेवर सुनावणी घेतली. फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन्स आणि युनायटेड डॉक्टर्स फ्रंट यांनी दाखल केलेल्या याचिकेला प्रतिसाद देताना न्यायालयाने केंद्र सरकार, नॅशनल टेस्टिंग एजन्सी आणि सीबीआय यांना त्यांचे उत्तर मागण्यासाठी नोटीस बजावली आहे. पुढील सुनावणी शुक्रवारी (२९ मे) होणार आहे.

याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकील तन्वी दुबे यांनी न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या विशेष खंडपीठासमोर परीक्षेच्या आयोजनासंदर्भात तक्रारी सादर केल्या आणि न्यायालयाच्या तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली. या याचिकांमध्ये नीट पुनर्परीक्षा प्रक्रियेवर न्यायालयीन देखरेखीची मागणीही करण्यात आली आहे.

या याचिकेत मागणी करण्यात आली आहे की, नीट-यूजी २०२६ पुन्हा घेण्याची संपूर्ण प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या एका निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या देखरेखीखाली व्हावी. या समितीत सायबर सुरक्षा तज्ज्ञ आणि न्यायवैद्यक शास्त्रज्ञाचा समावेश करण्याची मागणीही करण्यात आली आहे. नवीन स्वतंत्र परीक्षा मंडळ औपचारिकपणे स्थापित होईपर्यंत नीट-यूजी फेरपरीक्षा त्याच न्यायिक समितीच्या देखरेखीखाली घेण्यात यावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

तसेच, नीट चे केंद्रनिहाय निकाल सार्वजनिक करावेत, जेणेकरून कोणतेही असामान्य नमुने किंवा अनियमितता पारदर्शकपणे शोधता येतील, अशीही मागणी याचिकेत करण्यात आली आहे. याचिकेवर सुनावणी करताना, सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा पद्धतीच्या विश्वासार्हतेबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. संबंधित संस्थांनी पूर्वीच्या वादांमधून कोणताही धडा घेतलेला दिसत नाही, अशी कठोर टिप्पणी न्यायालयाने केली.सर्वोच्च न्यायालयाने याच मुद्द्यावर आधीच एक आदेश जारी केला आहे, ही खेदाची बाब आहे, असे खंडपीठाने नमूद केले. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने एनटीएला कडक प्रश्न विचारले आणि नीट २०२४ च्या वाद प्रकरणानंतर एक देखरेख समिती स्थापन करण्यात आली होती व तिच्या शिफारसी स्वीकारण्यात आल्या होत्या, याची आठवण करून दिली. समितीने केलेल्या शिफारसींची प्रत्यक्षात कशी अंमलबजावणी करण्यात आली, याचा तपशीलवार प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश न्यायालयाने आता एनटीएला दिले आहेत.

## विधानपरिषदेआधी काँग्रेसला धक्का?

## राज्यातील काँग्रेसचे ७० नगरसेवक नॉट रिचेबल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती**

राज्यात विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींनाही वेग आला आहे. अशातच राज्यातील काँग्रेसचे ७० नगरसेवक संपर्काबाहेर असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली असून विविध चर्चांनाही उधाण आलं आहे.अमरावती शहरात सध्या तरी अशी स्थिती नाही आहे सर्व नगरसेवक हे अमरावती शहरातच आहे. त्यामुळे सध्या तरी काँग्रेस निश्चिंत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार संपर्काबाहेर असलेले ७० नगरसेवक विदर्भातील वर्धा, चंद्रपूर



आणि गडचिरोलीतील असल्याचं सांगण्यात येत आहे. त्यामुळे काँग्रेसची चिंता वाढली आहे. महत्त्वाचे म्हणजे या मतदारसंघात अद्याप महाविकास आघाडीने उमेदवार जाहीर केलेला नाही. मात्र, त्यापूर्वी नगरसेवक संपर्क क्षेत्राबाहेर गेल्या विविध चर्चा रंगल्या आहेत.सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवानी वडेट्टीवार यांच्या संभाव्य उमेदवारीनंतर काँग्रेसमध्ये नाराजी आहे. यामुळे काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष पुन्हा

### राज्यात खळबळ

चर्चेत आला आहे. संपर्काबाहेर असलेल्या नरसेकवकांपैकी बऱ्यापैकी नगरसेवक चिमूर, सिंदेवाही, नागभीड, ब्रम्हपुरी, सावलीतील आहेत. त्यामुळे हा विजय वडेवट्टीवार यांच्यासाठी मोठा धक्का मानलो जातो आहे.दरम्यान, नगरसेवक संपर्काबाहेर गेल्याने विधान परिषदेच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात घोडे बाजार होत असल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात येत आहे. एका मतासाठी १० लाखांपर्यंत व्यवहार झाल्याचा दावा काही काँग्रेस नेत्यांनी केला आहे. इतकच नाही तर नगरसेवकांना आगाऊ रक्कम दिल्याचंही काँग्रेसचं म्हणणं आहे.

## विधानपरिषद निवडणूक लांबणीवर टाका

### आमदार रोहित पवार यांची मागणी; इंधन टंचाई अन् निवडणुकीतील घोडेबाजाराचा दिला दाखला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्यातील इंधन टंचाईचा दाखला देत विधान परिषदेची निवडणूक लांबणीवर टाकण्याची मागणी केली आहे. सध्या राज्यात मोठ्या प्रमाणात इंधन टंचाई निर्माण झाली आहे. पुण्यात तर जमावबंदीचे आदेश लागू झालेत. अशा स्थितीत विधान परिषद निवडणूकी घेण्याची गरज आहे का? ही निवडणूक पुढे ढकललेलीच बरी, असे ते म्हणालेत.

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी पुढील महिन्यात निवडणूक होणार आहे. या निमित्ताने सर्वच राजकीय पक्षांत जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. त्यातच आजपासून प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असताना आमदार रोहित पवार यांनी उपरोक्त मागणी केली आहे. आज राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात इंधन तुटवडा निर्माण झाला असून दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चालली आहे, पुण्यात तर जमावबंदीचे देखील आदेश लागू झाले आहेत. अशा स्थितीत विधानपरिषद



निवडणूक घेण्याची गरज आहे का ? यावर विचार होणं गरजेचं आहे.

असंही घोडेबाजार करूनच ह्या निवडणुका होणार आहेत. रिसॉर्ट, पर्यटन, मतदारांचा घोडेबाजार यावर शेकडो कोटी खर्च होतील. त्यामुळे निवडणूक आयोगाने राज्यातील बिकट परिस्थिती लक्षात घेत या निवडणुका पुढे ढकलायला हव्यात. निवडणुका पुढे गेल्यास या बिकट स्थितीत सरकारला सुद्धा सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ मिळेल, असे ते म्हणालेत.

## अमरावतीत विधान परिषद निवडणुकीत

## घोडेबाजाराला सुरुवात; मतांची किंमत लाखोंच्या घरात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती :** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच अमरावती जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांमध्ये हालचालींना वेग आला असून, इच्छुक उमेदवारांकडून पक्षश्रेष्ठींकडे लॉबिंग सुरू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुका या नेहमीच आर्थिक ताकद, गटबाजी आणि मतांच्या अंकगणितामुळे चर्चेत राहिल्या आहेत. यंदाही त्याचीच पुनरावृत्ती होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.

अमरावतीतून हर्षजीत देशमुख यांचे नाव विधान परिषदेसाठी




संभाव्य उमेदवार म्हणून पुढे येत असून, त्यांच्या समर्थनार्थ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात हार्दिक शुभेच्छांचे पोस्टर व्हायरल होत आहेत.

त्याचबरोबर मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध माध्यमांचा वापर सुरू झाला असून, सोहन




केकचे बॉक्स मतदाराच्या घरी पाठविले जात असल्याची चर्चा सध्या जिल्हाभर सुरू आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वीच प्रचार आणि संपर्क मोहिमेला अनौपचारिकरीत्या सुरुवात झाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, या निवडणुकीत मतांच्या व्यवहारांबाबतही जोरदार चर्चा रंगू लागली आहे. स्थानिक पातळीवर एका मताची किंमत तब्बल दहा लाख रुपयांपर्यंत पोहोचल्याच्या चर्चेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत पैशांचा प्रभाव निर्णायक ठरणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक इच्छुकांकडून नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधींशी संपर्क वाढविण्यात येत असल्याचेही बोलले जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुका या थेट जनतेकडून न होता निवडक लोकप्रतिनिधींकडून होत असल्याने प्रत्येक मत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी विविध राजकीय डावपेच आखले जात असल्याची चर्चा रंगत आहे. काही ठिकाणी गुप्त बैठका, तर काही ठिकाणी पक्षांतर्गत नाराजी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे.

अमरावती जिल्ह्यात या निवडणुकीसाठी एकूण ४५३ मतदार असून, त्यामध्ये विविध स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांचा समावेश आहे. आगामी काही दिवसांत उमेदवारी अर्ज, पक्षनिहाय रणनीती आणि राजकीय समीकरणांमुळे जिल्ह्यातील राजकारण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नाशिकरोड कारागृहात अधिकाऱ्यांची आरोपीसोबतच ‘दारू पार्टी’!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ नाशिक**

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षेच्या व्यवस्थेवर तसेच तेथील प्रशासकीय शिस्तीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. घटना अशी आहे की, एका गंभीर फसवणुकीच्या गुन्ह्यातीळ संशयित आरोपीसोबत कारागृहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी थेट दारू पार्टी केल्याचे समोर आले आहे. याचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर कर्तव्यावर कसूर केल्याचा ठपका ठेवत ३ तुरुंग अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोचक टीका केली आहे. ते म्हणाले, महाराष्ट्र कायद्याचा बालेकिल्ला होण्याऐवजी दारूचा खंबा झालाय, अशी टीका त्यांनी केली आहे.

या गंभीर प्रकाराबद्दल मिळालेल्या माहितीनुसार, एका व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या अधिकारी

### तीन तुरुंग अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

निवसस्थानाच्या बाहेरील परिसरात तीन जबाबदार अधिकारी एका संशयित आरोपीसोबत दारू पार्टी करत असल्याचे दिसून आले आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर, गंभीर स्वरूपातील आरोप असलेल्या आरोपीसोबत पोलिसांचे असे लागेबंध असल्याचे पाहून संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, या व्हायरल व्हिडिओच्या आधारे मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने वरिष्ठ पातळीवर तपास करून आपला प्राथमिक अहवाल सादर केला आहे. यात हिरालाल भांमरे (तुरुंग अधिकारी), जगदीश ढुमणे (तुरुंग अधिकारी), अशोक मलवाड (तुरुंग अधिकारी) या तिन्ही अधिकाऱ्यांवर कर्तव्यवर कसूर केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. हे तिन्ही अधिकारी २०१४ पासून नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात कार्यरत आहेत. प्रशासनाने या तिघांनाही नोटीस



बजावली असून ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

## पहिल्या दिवशी प्रवीण पोटे, बबलू देशमुख, विरेंद्र जगताप यांच्यासह आठ जणांनी केली १६ अर्जाची उचल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** तब्बल आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अमरावती विभाग विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज प्रक्रियेला सोमवार, २५ मेपासून अधिकृत सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे, कांग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार विरेंद्र जगताप यांच्यासह आठ जणांनी एकूण १६ उमेदवारी अर्जाची उचल केल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सकाळपासूनच विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांची गर्दी पाहायला मिळाली. निवडणूक विभागाकडून उमेदवारी अर्जदाखल करण्यासाठी आवश्यक नियम व अटी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. सर्वसामान्य प्रवर्गातील उमेदवारांना १० हजार रुपये तर राखीव प्रवर्गातील

उमेदवारांना ५ हजार रुपयांची अनामत रक्कम भरावी लागणार आहे. तसेच अर्जासोबत मतदार यादीतील किमान १० सूचकांच्या स्वाक्षर्या अनिवार्य राहणार आहेत. याशिवाय उमेदवारांना गुन्हेगारी पार्श्वभूमी, चल-अचल मालमत्ता, शासकीय निवासस्थान यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. नमुना २६ मधील प्रतिज्ञापत्र न्यायदंडाधिकारी किंवा नोटरीसमोर सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कोणताही रकाना रिकामा ठेवू नये, अशा सूचनाही प्रशासनाने दिल्या आहेत. राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव असल्याची प्रमाणित



प्रत अथवा मतदार नोंदणी अधिकार्याचे प्रमाणपत्र जोडावे लागणार आहे. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो व त्यामागे उमेदवाराची स्वाक्षरी आवश्यक राहणार आहे.यापूर्वी २४ मे २०१८ रोजी या मतदारसंघाची मतमोजणी पार पडली होती. त्यानंतर प्रथमच ही निवडणूक होत असल्याने राजकीय पक्षांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून असून, २ जून रोजी अर्जाची छाननी होणार आहे. ४ जूनला अर्ज माघारीची अंतिम तारीख राहणार असून, १८ जून रोजी मतदान आणि २२ जूनला मतमोजणी होणार आहे. अवघ्या २८ दिवसांत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. निवडणुकीदरम्यान

आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र तीन पथकांची नियुक्ती केली आहे. विविध विभागांसाठी नोडल अधिकार्यांची नेमणूक करण्यात आली असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहेत.यंदाच्या निवडणुकीत महापालिकेतील आठ तसेच विविध नगरपालिकांतील ३४ स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार मिळाल्याने या सदस्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. या मतदारसंघात एकूण ४५३ मतदार असून त्यामध्ये २२६ महिला व २२७ पुरुष मतदारांचा समावेश आहे. त्यामुळे प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार असून राजकीय समीकरणांना वेग आला आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करताना सुरक्षेच्या दृष्टीनेही निर्बंध लागू करण्यात आले आहेत. निवडणूक निर्णय अधिकार्यांच्या कक्षाबाहेरील १०० मीटर परिसरात केवळ तीन वाहनांनाच प्रवेश राहणार आहे. तसेच उमेदवारासह फक्त पाच जणांनाच अर्ज दाखल करताना प्रवेश दिला जाणार आहे. उमेदवारी अर्जाची किंमत १०० रुपये निश्चित करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

# अंबादेवी संस्थानची जमीन विक्री रोखली

## संपादकीय ......

## साठेबाजांच्या मुसक्या आवळा


*होर्मुझमधील तणावानंतर पेट्रोल पंप आणि गॅस एजन्सीबाहेर रांगांचे एक आवर्तन येऊन गेल्यानंतर आता पुन्हा तसे प्रकार काही भागांत घडताना दिसत आहेत. यामागे अफवा आणि संभाव्य संकटाच्या भीतीतून इंधन खरेदी हेच कारण आहे. त्यातूनच इंधनाची साठेबाजी करणार्यांवर कठोर कारवाई करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्यानंतर इंधन तुटवड्याच्या परिस्थितीत काही फरक पडेल, अशी आशा निर्माण झाली आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी शेतीची मशागत करण्यासाठी ग्रामीण भागात विशेषत: मराठवाडा व विदर्भात इंधनाच्या मागणीत मोठी वाढ झाली. पंपांवर इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे व पेट्रोल-डिझेलचे टँकर वेळेवर पोहोचत नसल्यामुळे इंधन कधी मिळणार, या विषयी अनिश्चितता आहे. अनेक शहरातून व गावागावांत इंधनासाठी लांबलचक रांगा लागल्या आहेत. अनेक ठिकाणी पंपांवरील कर्मचार्यांशी लोकांची भांडणे होत आहेत. कुठे मारहाणीचे प्रकार घडले, तर कुठे शस्त्रास्त्रे दाखवून धमक्या दिल्याच्या घटना घडल्या. अनेक पंपांवर इंधनाचे टँकर येतील म्हणून लोकांनी रात्रभर मुक्काम केल्याच्या घटना घडल्या. पेट्रोल पंपावरच रांगेत बसून लोकांचे जेवण-खाणं चालू असल्याचे चित्र या भागात काही ठिकाणी आहे. पेट्रोल पंपाच्या बाहेर दुचाकी-चारचाकी वाहनांच्या रांगा दिसताहेत. काही ठिकाणी चेंगराचेंगरी, रेटारेटीचे प्रसंगही घडले. आठ-आठ, दहा-दहा तास रांगेत उभे राहिलेल्या लोकांकडून पेट्रोल पंपावर ओळखपत्र मागण्याचे प्रकार काही ठिकाणी घडल्याने तिथे वादंगाला तोंड फुटले व तणावाचे वातावरण निर्माण झाले. गेल्या आठ-दहा दिवसांपासून महाराष्ट्राला इंधन टंचाईचा फटका बसला आहे. अशा संकटाच्या वेळी कोणी इंधनाची साठेबाजी करून सर्वसामान्य लोकांच्या जीवाशी खेळत असेल व शेतकर्यांना वेठीला धरीत असेल, तर त्या साठेबाजांना व इंधनाचा काळाबाजार करणार्यांना शोधून काढून त्यांच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई केली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागतिक संकटाची चाहूल ओळखून देशवासीयांना दोन आठवड्यांपूर्वीच सावध केले होते. इंधन जपून वापरा, वर्क फ्रॉम होम सुरू करा, मेट्रोने प्रवास करा, खासगी मोटारीतून एकापेक्षा जास्त लोकांनी एकत्र प्रवास करा असे त्यांनी सुचवले. इंधनाच्या भाववाढीविषयी सूतोवाच केले. गेल्या दोन आठवड्यांत पेट्रोल-डिझेलच्या किमतीत तिसर्यांदा वाढ झाली. देशातील तीन प्रमुख तेल कंपन्यांना दरमहा तीस हजार कोटींचा तोटा होतो, तरीही नागरिकांवर त्याचा बोजा टाकला गेलेला नाही. जगातील बहुतेक देशांमधे इंधनाच्या किमतीत ३५ ते ५० टक्के दरवाढ झाली. तुलनेने भारतात अजूनही माफक दरवाढ आहे. या स्थितीत साठेबाजी किंवा काळाबाजार करून कोणी आपले उखळ पांढरे करून घेत असतील, तर त्यांना वेळीच चाप लावला पाहिजे. महाराष्ट्रात मे महिन्यात इंधनाच्या मागणीत वीस टक्के वाढ झाली असल्याचे राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनीच आकडेवारी देऊन सांगितले आहे. इंधन वेळेवर मिळत नाही, इंधनाचे टँकर वेळेवर व नियमित येत नाहीत. त्यामुळे राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल शिल्लक नाही, असे फलक झळकताना दिसतात. त्यामुळे लोकांमध्ये घबराट निर्माण होते. पंपावर पेट्रोल-डिझेल उपलब्ध असताना घरातून प्लास्टिकचे मोठे डबे बरोबर नेऊन त्यांत इंधन भरून आणण्याची मानसिकता वाढली आहे. ही वेळ का आली, याचा सरकारी पुरवठा यंत्रणांनी शोध घेतलेला बरा! अनेक ठिकाणी आता मर्यादित इंधन दिले जात आहे. म्हणून इंधन साठवणूक करण्याची प्रवृत्ती वाढीला लागते. त्यातून काळाबाजाराला संधी मिळते. इंधनाच्या काटकसरीची जबाबदारी आपलीही आहे, ही कर्तव्यभावना लोकांमधे रुजवणे गरजेचे आहे. केवळ सरकारी फतवे काढून लोकांवर परिणाम होणार नाही. लोकप्रतिनिधींनी, कार्यकर्त्यांनी व स्वयंसेवी संस्थांनी त्यासाठी नागरिकांचे प्रबोधन करणे गरजेचे.*

*राज्यात इंधनाचा पुरेसा साठा आहे, लोकांनी घाबरून जाण्याचे काहीही कारण नाही, असे मुख्यमंत्री व अन्न व नागरी पुरवठामंत्री यांनी वारंवार स्पष्ट केले आहे, तरीही इंधनाचा साठा करण्याची मानसिकता वाढत आहे. त्यातूनच या महिन्यात इंधनाची मागणी वाढलेली दिसते. मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात इंधनाची मागणी २० टक्के वाढली. नंतरही तोच कल बघायला मिळतो. राज्यात जिथे रोज २१ टक्के इंधनाची विक्री होत असे, ती एकाच दिवशी ४२ टक्के झाल्याची धक्कादायक आकडेवारी पुढे आली. याच वेगाने मागणी वाढत राहिली, तर राज्यात मागणी व पुरवठा यांच्यात मोठी तफावत पडू शकते व त्यातून नवीन संकट उभे राहू शकते. मे महिन्यात मराठवाडा व विदर्भात इंधनाची मागणी विलक्षण वाढली. वाशीमसारख्या ठिकाणी डिझेलच्या विक्रीत १०९ टक्के, तर पेट्रोलच्या विक्रीत ४२ टक्के वाढ झाली. अकोला येथे इंधनाची मागणी १११ टक्के वाढली. छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, परभणी, बुलडाणा या जिल्ह्यांत इंधनाच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली. धाराशिव व बुलडाणा जिल्ह्यात इंधनाची मागणी १३ वरून ६३ टक्क्यांवर पोहोचली. मान्सूनपूर्व शेतीच्या कामासाठी इंधनाची मागणी वाढली, हे त्याचे प्रमुख कारण असले, तरी साठेबाजांकडून तयार केली जात असलेली अनावश्यक भीती हेही एक कारण आहे. इंधनाचे दर वाढत असल्याने माल वाहतूक, प्रवासी वाहतूक, शेतीचा खर्च, बस, ऑटो रिक्षाचे भाडे वाढण्याची शक्यता आहे. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर येऊन जनजागृती करावी व लोकांना दिलासा देण्याची गरज आहेच. इंधन वितरण साखळी अधिक पारदर्शक करण्याबरोबरच प्रत्येक जिल्ह्यातील उपलब्ध साठ्याची माहिती प्रशासनाने नियमितपणे जाहीर करणे गरजेचे आहे. नागरिकांनीही अफवांवर विश्वास न ठेवता संयमाने व जबाबदारीने इंधनाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. सोशल मीडियावर पसरवल्या जाणार्या अपुर्या माहितीद्वारे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. इंधनाचा पुरेसा साठा असेल, तर पुरवठ्यातील त्रुटी सुधारण्याची जबाबदारी सरकारची आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांनी त्यावर भाष्य करताना ही टंचाई कृत्रिम असण्याची शक्यता आणि संशय व्यक्त केला आहे. तसे असेल, तर पुरवठा खात्याने त्यावर राज्यभर धडक कारवाई केलीच पाहिजे. साठेबाजांच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत.*

## धर्मादाय आयुक्तांचा दणका!

## अग्रवाल व कान्नव यांनी घेतला होता आक्षेप, बिल्डर लॉबीत खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**



अमरावती येथील पुरातन अंबादेवी मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम करण्याकरिता संस्थेच्या विश्वस्तांनी अकोली रिंग रोडलगतची ३.५२ हेक्टर शेती विकण्याची निविदा काढली होती. शहरातील काही बिल्डरांनी निविदा भरली आणि शेत विक्रीचा लिलाव होण्यापूर्वीच अंबादेवीचे भक्त शेखर पुरूषोत्तम कान्नव आणि रामकिशोर नंदलाल अग्रवाल यांनी आक्षेप घेतल्यामुळे धर्मदाय सहआयुक्त दीपक खोचे यांनी शेत विक्रीला स्थगिती दिली. त्यामुळे बिल्डर लॉबीत चांगलीच खळबळ उडाली आहे.अमरावती शहरातील अंबादेवीचे सुमारे ५०० वर्षांपासूनचे पुरातन मंदिर आहे. राज्यासह अन्य राज्यातील भाविक येथे अंबादेवीच्या दर्शनाला येतात. नवरात्रीला ९ दिवस मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी यात्रा भरते. पुरातन मंदिर असल्यामुळे मंदिराचा गाभारा जिर्ण झाला आहे. तसेच संस्थेच्या विश्वस्तांनी एक हॉस्पिटल बांधण्याचा निर्णयसुध्दा घेतला आहे. याकामाकरिता कोट्यवधी रुपयांचा खर्च होणार असल्यामुळे संस्थेच्या विश्वस्तांनी अकोली रिंग रोड लगतची ३.५२ हेक्टर शेती विकण्याचा निर्णय घेतला. २९ नोव्हेंबर २०२५ ला वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा काढली होती. तेव्हा शहरातील बिल्डर वरुण मालू यांनी प्रती एकर १.३३ कोटी, आडवाणी यांनी १.३१ कोटी आणि अनिश मेहता यांनी प्रती एकर १.३५ कोटी रुपयांची निविदा दाखल केली होती. त्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी अनिश मेहता यांची प्रती एकर १ कोटी ३५ लाख रुपये ही आधारभुत किंमत समजून ५ मे २०२६ रोजी खुल्या न्यायालयात बोली बोलाविण्याची जाहिरात दिली. त्यानंतर १५ मे २०२६ रोजी खुल्या न्यायालयात सुरु असलेल्या बोलीमध्ये शहरातील चार बिल्डरांनी उडी घेतली. यामध्ये आर.आर. अग्रवाल, प्रणय अनिल अग्रवाल, सुनील सिताराम भुत आणि संदेश अनुपमजी झंवर यांचा समावेश होता. परंतु १२ मे रोजी रामकिशोर अग्रवाल आणि १५ मे ला शेखर कान्नव या दोन्ही भक्तानी शेत विक्रीवर आक्षेप घेतला. आक्षेपात त्यांनी नमुद केले की, संस्थेवर २०१७ पासून तत्कालीन सहधर्मदाय आयुक्त अमरावती यानी सुमोटो कारवाई करुन संस्थानमध्ये सुरु असलेले कोट्यवधी रूपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आणला आणि कलम ४१ (ब) अंतर्गत प्रकरण स्वयंखुद्द दाखल केले होते. हे प्रकरण प्रलंबित असताना संस्थेला जंगम मालमत्ता विकता येत नाही. महाराष्ट्र शासनसोबत संस्थानचे विश्वस्त फसवणूक करत आहेत. अमरावती जिल्हाधिकारीद्वारा अकोली रिंग रोड लगरच्या संस्थेच्या ३.५२ हेक्टर पैकी ०.९१ आर हेक्टर शेती अकोली रिंग रोडकरीता २०२५ मध्ये संपादित केलीआहे. तरीसुध्दा संस्थान पूर्ण ३.५२ हेक्टर शेती विक्रीच्या बेतात आहे. शेती विक्रीकरिता कलम ३६ (१) (अ) अंतर्गत केलेल्या अर्जात संस्थेने जीणर्णोद्धार व हॉस्पिटल बांधकामाकरिता ४१ कोटी रूपये रक्कम आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर शेती विकून संस्थेला मात्र १० कोटी रुपये मिळणार आहेत. त्यामुळे उर्वरित ३१ कोटी रुपये संस्था कुठून गोळा करणार असा प्रश्न अनुत्तरित आहे.यावरुन संस्थानची आणखी मालमत्ता भविष्यात विक्रीला काढण्याची शक्यता आहे. संस्थेने अगोदर जीर्णोद्धारा व हॉस्पिटल बांधकामाकरिता भाविकभक्तांकडून देणगी गोळा करणे आवश्यक होते, असा आक्षेप रमकिशोर अग्रवाल आणि शेखर कान्नव यांनी घेतला आहे. त्यामुळे धर्मादाय सहआयुक्त दीपक खोचे यांनी शेती विक्रीच्या निविदेवर स्थगिती दिली आहे. त्यामुळे शहरातील बिल्डर लॉबीत चांगलीच खळबळ उडाली आहे.

### बिल्डर लॉबीच्या दबावात शेत विक्री

अंबादेवी संस्थानच्या विश्वस्तांनी ६६ मागील १० वर्षांपासून मोठ्या प्रमाणात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. संस्थेत प्रचंड प्रमाणात गैरप्रकार सुरू आहे. तसेच बिल्डर लॉबीच्या दबावात कोट्यवधी रुपयांचे शेत कवडीमोल भावात विकण्याचे षडयंत्र संस्थेचे विश्वस्त करीत आहेत.

**रामकिशोर अग्रवाल, अंबादेवी भक्त.**

## ५२ हजार शेतकऱ्यांना ७५७ कोटींचे खरीप पीककर्ज वाटप

### कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत, खासगी बँका पिछाडीवर,जिल्हा बँक मात्र सुसाट

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**



अग्रणी बँकेमार्फत अमरावती जिल्ह्यासाठी खरीप हंगामात पीक कर्ज वाटपाचे मोठे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ५२ हजार १८४ शेतकऱ्यांना एकूण ७५७ कोटी १२ लाख रुपयांचे पीक कर्ज वितरित करण्यात आले आहे. आतापर्यंतच्या कर्ज वाटपात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आघाडी घेतली आहे. मात्र ११ राष्ट्रीयकृत व ७ वाणिज्य बँका कर्जवाटपात पिछाडीवर * असल्याचे आकडेवारीतून दिसून येत आहे.

जिल्ह्यातील तब्बल १ लाख ८८ हजार ६०० शेतकऱ्यांना १ हजार ६५० कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप - करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्ह्यातील ११ राष्ट्रशीयकृत बँका, ७वाणिज्य बैंका, ग्रामीण बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या माध्यमातून १ एप्रिलपासून पीक कर्ज वाटपाला सुरुवात करण्यात आली. खरीप हंगामाची तयारी सुरू असताना शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळावी यासाठी बँकांनी प्रक्रिया गतिमान केली आहे. सध्यापर्यंत जिल्ह्यातील ५२ हजार १८४ शेतकऱ्यांना एकूण ७५७ कोटी १२ लाख रुपयांचे पीक कर्ज वितरित करण्यात आले असून, हे एकूण उद्दिष्टाच्या सुमारे ४६ टक्के इतके आहे. यामध्ये राष्ट्रीयकृत बँकांनी ९ हजार जिल्हा बँक मात्र सुसाट पालकमंत्र्यांनी बँकांना दिला होता इशाराजिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना बँकांनी वेळेत कर्ज वाटप करावे. यामध्ये अनियमितता दिसून आली तर, बँकांवर कारवाई करण्यात येईल. वेळ पडल्यास शेतकऱ्यांनी गुन्हेही दखल करावे. याशिवाय बँकांचे पाणी, वीज, रस्ते बंद होईल, असा इशारा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा खरीप हंगाम बैठकीत दिला होता.९५३ शेतकऱ्यांना १५० कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरित केले आहे. त्यांची कामगिरी सुमारे २० टक्के इतकी आहे. ग्रामीण बँकांनी ५४७ शेतकऱ्यांना सुमारे ७ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीक कर्ज वाटपात सर्वाधिक आघाडी घेतली आहे. या बँकेमार्फत तब्बल ४१ हजार ६८४ शेतकऱ्यांना ५९५ कोटी ५६ लाख रुपयांचे कर्ज वितरित केले असून, उद्दिष्टपूर्तीची टक्केवारी ७६ टक्यांवर पोहोचली आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कार्यपद्धतीचे कौतुक होत आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक पाठबळ मिळाल्यास बियाणे, खत आणि मशागतीची कामे सुलभ होणार आहेत. येत्या काही दिवसांत उर्वरित शेतकऱ्यांनाही कर्ज वाटप करण्यासाठी राष्ट्रीयकृत व खासगी बँकांकडून आघाडी घेणे गरजेचे आहे.

## पदोन्नती यादीवर शिक्षकांचा आक्षेप

### अन्याय होत असल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती :** विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ व ३ पदोन्नती प्रक्रियेत नियमबाह्य पद्धतीने काम सुरू असल्याचा आरोप करत सेवाज्येष्ठ शिक्षकांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे सामूहिक निवेदन सादर केले आहे. तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता यादीवर शिक्षकांनी तीव्र आक्षेप घेत सीईटी/टीईटी पात्रता, कट ऑफ तारीख आणि ज्येष्ठता निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, पदोन्नतीसाठी १ सप्टेंबर २०२५ ही कट ऑफ तारीख निश्चित केल्यामुळे अनेक पात्र शिक्षकांवर अन्याय होत आहे. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयांचा दाखला देत पदोन्नती प्रक्रिया सुरू होताना संबंधित शिक्षकाकडे ढएढ/उएढ पात्रता असणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार दरवर्षी जानेवारीत ज्येष्ठता यादी प्रसिद्ध होणे अपेक्षित असताना सप्टेंबर २०२५ पर्यंतची यादी तयार करण्यात आल्याने प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

डीपीसी बैठक न घेता पदोन्नती प्रक्रिया सुरू केल्याचाही आरोप शिक्षकांनी केला आहे. चुकीची यादी रद्द करून डीपीसी बैठकीपर्यंत पात्र होणाऱ्या सर्व शिक्षकांचा विचार करावा, अन्यथा न्यायालयीन लढा उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## अकरावी प्रवेश प्रक्रियेत यंदा प्रथमच मुलींसाठी विशेष फेरी

### तिसऱ्या दिवशीही प्रवेशाचे संकेतस्थळ संथच

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**



अकरावी प्रवेशाची नोंदणी पहिले २ दिवस संकेतस्थळ बंद झाल्याने करता आली नाही. यामुळे गोंधळ उडाला होता. तिसऱ्या दिवशी संकेतस्थळ सुरू झाले खरे, परंतु पुन्हा दुपारी संथ झाल्याने प्रिंट काढण्यात अडचणी येत असल्याचे चित्र दिसून आले. यंदा प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीपासून तांत्रिक अडचणी येत असल्या तरी विद्यार्थी-पालकांना दिलासा आहे. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच मुलींसाठी विशेष फेरी घेतली जाणार असून, प्रवेशाच्या एकूण पाच फेऱ्या होणार आहेत.शून्य प्रवेश फेरी संपल्यानंतर २१ मेपासून राज्यभरात पुन्हा अकरावी ऑनलाइन प्रवेश नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, २२ मे रोजी संकेतस्थळ क्रॅश झाल्याने मोठा गोंधळ उडाला. याप्रकारामुळे २३ मेपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणीसाठी देण्यातआलेली ही मुदत २५ मेपर्यंत करण्यात आली. मात्र पुन्हा शनिवारी संकेतस्थळ संथ झाल्याने अर्जाचा भाग दुसरा भरण्यासाठी २७ मेपर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. यंदा प्रवेश प्रक्रियेत मागील गोंधळ टाळण्यासाठी फक्त पाचच प्रवेश फेऱ्या होतील. त्यातील कोटा प्रवेशाची शून्य १९ मे रोजी घेण्यात आली. ज्यात फेरीत नुकतीच १८ व इनहाउस, अल्पसंख्याक आणि मॅनेजमेंट कोट्यातील प्रवेश करण्यात आले. आता पुढे नियमित चार फेऱ्या आणि एक विशेष फेरी मुलींसाठी घेतली जाणार आहे.

### १५ जुलैपूर्वी तासिका

मागील वर्षी फेब्रुवारीपर्यंत प्रवेश प्रक्रिया चालल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. यंदा मात्र वेळेत प्रक्रिया पूर्ण करून १५ जुलैपूर्वी अकरावीच्या तासिकांना सुरुवात करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आल्याचे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

## ई-क्लास जागा हस्तांतरास ग्रामस्थांचा विरोध

### सरकारकडे तक्रार, सहा जूनपासून तीव्र आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगावबारी,**

अमरावती तालुक्यातील मासोद गावातील आरक्षित जागा अन्य ठिकाणी हस्तांतरित करण्याच्या हालचालींविरोधात ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. यासंदर्भात तहसीलदार, जिल्हाधिकारी, पोलिस प्रशासनासह मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत निवेदन सादर करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. गावकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असलेली ही आरक्षित जागा कोणालाही देऊ नये, अन्यथा सहा जून २०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनी तीन दिवस तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला असल्याचे शेतकरी गिरीश चौधरी यांनी सांगितले. भविष्यातील ग्रामविकासाची योजना या जागेवर अवलंबून आहे. जागेच्या हस्तांतरणामुळे गावाचा सर्वांगीण विकास ठप्प होण्याची शक्यता आहे. ग्रामस्थांनी शासनाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करीत ही जागा कुणाच्याही ताब्यात देऊ नये , अशी जोरदार मागणी केली आहे. शेतकरी गिरीश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी निवेदन सादर केले असून त्यांनी सांगितले की, गावाच्या मूलभूत गरजा, भविष्यातील विकास, आरोग्य-सुविधा आणि सुरक्षेसाठी ही जागा अनमोल आहे. शासनाने निर्णय मागे घेतला नाही तर सहा जून २०२६ पासून तीव्र आंदोलन उभारले जाईल. मुख्यमंत्री, खासदार बळवंत वानखडे, अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी ग्रामपंचायत सदस्य व सचिव यांना निवेदन देण्यात आले.आरक्षित जागा बदलण्यामागील निर्णयावर प्रश्नचिन्ह अमरावतीच्या तहसीलदारांनी काढलेल्या पत्रानुसार काही जमीन ई-क्लास प्रकल्पासाठी दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून येते. परंतु गावकऱ्यांचे म्हणणे असे की, ही जागा शैक्षणिक विकास, आरोग्य केंद्र, महिला उद्योगाभिमुख उपक्रम, ग्रामविकास कार्ये, महिला बचतगट, पाणीपुरवठा इत्यादींसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

### भाविक व ग्रामस्थांची मागणी, श्री गोविंदप्रभू महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले

## श्री गोविंदप्रभू तीर्थस्थान तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात समाविष्ट करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नांदगावपेठ-** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नांदगावपेठ येथील साडेआठशे वर्षे पूर्व प्राचीन व पवित्र श्री गोविंदप्रभू तीर्थस्थानाचा विकास आराखडा तयार करण्यात यावा आणि या तीर्थक्षेत्राला राज्यस्तरीय दर्जा मिळावा, अशी मागणी भाविक भक्त व ग्रामस्थांच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानातील गुरुद्वारा करतारपूर कॉरिडॉर उभारणीसाठी पुढाकार घेतला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी मुंबई येथील इंदू मिलची जागा उपलब्ध करून दिली. त्याच धर्तीवर नांदगावपेठ येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री गोविंदप्रभू तीर्थस्थानाचा विकास आराखडा तयार करून या पवित्र स्थळाचा विकास करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नांदगावपेठ येथील हे तीर्थस्थान महानुभाव संप्रदायाचे जनक श्री चक्रधरस्वामी यांचे गुरू श्री गोविंदप्रभू महाराज यांच्या



पदस्पर्शाने पावन झालेले असून, हे ठिकाण आजही उपेक्षित असल्याची खंत भाविकांनी व्यक्त केली आहे. गेल्या सहा वर्षांपासून ट्रस्टच्या माध्यमातून या तीर्थस्थानाच्या विकासासाठी प्रयत्न सुरू असून, याठिकाणी भव्य-दिव्य मंदिर उभारण्यात यावे तसेच जिल्ह्यातील हे महत्त्वाचे तीर्थस्थान मुख्य प्रवाहात आणण्यात यावे, अशी मागणी विनयमुनी दर्यापूरकर, गोवर्धनमुनी दर्यापूरकर, उद्धवमुनी दर्यापूरकर यांच्यासह महानुभाव वारकरी मंडळी, स्थानिक ग्रामस्थ, परिसरातील भक्तगण तसेच सर्व सामाजिक, राजकीय, धार्मिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

### देशभरातून भाविकांची वर्दळ

महानुभव पंथीयांसाठी नांदगावपेठ तीर्थक्षेत्र हे अत्यंत महत्त्वाचे असून देशभरातून भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनाला येथे दैनंदिन दाखल होत असतात. मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भाविकांसाठी सभामंडप उभारण्यात आला असून मंदिराच्या उद्धारासाठी भाविकांनी सहकार्य करण्याचे आवाहन नांदगावपेठ येथील श्री गोविंदप्रभू तीर्थस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# नेहरू मैदान मधील ऐतिहासिक शाळा मनपा कडून दुर्लक्षित

## नेताजींनी केले होते शाळेचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

अमरावती शहराच्या मध्यवर्ती भागात असलेली ९८ वर्षे जुनी नेहरू मैदान परिसरातील ऐतिहासिक वास्तू महापालिका प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे अत्यंत दुरवस्थेत पोहचली आहे. एकेकाळी राष्ट्रगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते १९२८ मध्ये लोकार्पण झालेल्या आणि अनेक मान्यवरांचे प्राथमिक शिक्षण केंद्र राहिलेल्या या वास्तूची आज कमालीची पडझड झाली असून, ही ऐतिहासिक इमारत अक्षरशः अश्रू ढाळत आहे.

या ऐतिहासिक वारशाच्या अत्यंत भयंकर दुरवस्थेकडे महापालिकेचे स्वीकृत नगरसेवक दिनेश बुब आणि अनिल अग्रवाल यांनी प्रशासनाचे तीव्र लक्ष वेधले आहे. महापालिका प्रशासनाच्या कारभारावर जोरदार आक्षेप घेत, या दोन्ही लोकप्रतिनिधींनी आपल्या विकास निधीतून आणि सार्वजनिक निधीच्या माध्यमातून या ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्याची तयारी दर्शवली आहे. या जागेची पाहणी केली असता तिथे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, सर्वसामान्य नागरिकांना तिथे उभे राहणेही कठीण झाले आहे.



या ऐतिहासिक इमारतीतून अनेक नामवंत व्यक्तींनी प्राथमिक शिक्षण घेतले असून शहराच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक इतिहासात या वास्तूचे महत्त्वाचे स्थान आहे. मात्र सध्या इमारतीच्या भिंतींना तडे गेले असून परिसरात अस्वच्छता वाढली आहे. आवश्यक दुरुस्ती व संवर्धनाअभावी वास्तूचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.ज्या वास्तूचे जतन करून तिचे सौंदर्य टिकवणे महापालिकेचे कर्तव्य होते, तिथे आज कमालीचे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, ही जुनी इमारत केवळ जीर्ण आणि खिळखिळी



झाली नसून पूर्णपणे कचराघर बनली आहे.

काही वर्षांपूर्वीपर्यंत महापालिकेची मराठी आणि हिंदी माध्यमाची प्राथमिक व माध्यमिक शाळा या इमारतीमध्ये अत्यंत उत्साहात सुरू होती. बालकांच्या किलबिलाटाने आणि अभ्यासाने गजबजणारे हे वर्ग आज उजाड झाले आहेत. काही वर्षांपूर्वी या इमारतीच्या लाकडी छताला आग लागण्याची दुर्घटना घडली होती, मात्र तरीही महापालिका प्रशासनाला जाग आली नाही. प्रशासकीय राजवटीत आणि त्यानंतरच्या काळातही याकडे पूर्णपणे कानाडोळा करण्यात आला. आजही तिथे वर्गांमध्ये पडलेले फलक आणि मुलांनी बनवलेले अभ्यास तक्ते विखुरलेल्या अवस्थेत प्रशासनाच्या नाकर्तेपणाची साक्ष देत आहेत. पुढील दोन वर्षांत नानासाहेब गोखले स्मारक ही इमारत शतकोत्तर वर्षात पदार्पण करणार आहे.

काळानुसार या वास्तूची दुरुस्ती करून तिला अधिक सुंदर बनवणे गरजेचे होते, परंतु कोणत्याही अधिकाऱ्याने साधी पाहणी करण्याची तसदी घेतली नाही. त्यामुळे आज खिडक्या, दरवाजे तुटून गेले असून इमारतीमध्ये भटक्या श्वानांचा वावर वाढला आहे. भरदिवसा तिथे गैरप्रवृत्तीच्या लोकांचा राबता असतो, तर रात्रीच्या वेळी अनैतिक कारभार आटोपणाऱ्या लोकांनी या कक्षांचा ताबा घेतला आहे. शिवसेना नेते दिनेश बुब यांनी या सर्व प्रकाराला महापालिकेची अक्षम्य घोडचूक म्हटले असून, अमरावतीची ओळख असलेली ही वास्तू रामभरोसे सोडल्याबद्दल संताप व्यक्त केला आहे.

काँग्रेस नेते अनिल अग्रवाल यांनीही शहराचे वैभव असलेल्या या स्मारकाची काळजी घेणे सर्वांचेच कर्तव्य असल्याचे सांगत, स्वतःच्या घराप्रमाणे या वास्तूची देखभाल व्हायला हवी होती अशी भावना व्यक्त केली. या ऐतिहासिक वारशाला पुनरुज्जीवित करण्यासाठी दोन्ही लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला आहे.

# पत्नीला माहेरी सोडून ४ मुलांना विहिरीत ढकलले

## नंतर बापानेही केली आत्महत्या

### बुलढाण्याच्या जळगाव जामोद तालुक्यातील भयंकर घटना

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२५बुलढाणा-** एका व्यक्तीने पत्नीला माहेरी सोडल्यानंतर ४ मुलांना विहिरीत ढकलून स्वतःही आत्महत्या केल्याची भयंकर घटना बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात घडली आहे. या व्यक्तीने हे टोकाचे पाऊल का उचलले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण हृदय पिळवटून टाकणारी ही घटना कौटुंबिक वादातून घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय मुसा किराडिया असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तर त्याने विहिरीत लोटलेल्या मुलांची नावे प्रित किराडिया, प्राची किराडिया, पूर्वी किराडिया व पियुष किराडिया अशी आहेत. विजय किराडिया हा भाले अंजन गावचा रहिवासी आहे. विजयचे आपल्या पत्नीशी भांडण झाले होते. त्यानंतर सोमवारी ती घर सोडून आपल्या माहेरी निघून गेली होती. त्यामुळे विजय आज सकाळी स्वतः घरचे काम करत होता. यावेळी त्याच्या वडिलांनी तू काम का करत आहेस? तुझी बायको कुठे गेली? असा प्रश्न केला. त्यातून झालेल्या वादातून विजय किराडिया यांनी आपल्या चारही मुलांना राजुरा धरण परिसरातील विहिरीत ढकलून स्वतःही आत्महत्या केली.




या भागातील स्थानिक नागरिकांना विहिरीत ५ मृतदेह तरंगताना आढळले. त्यांनी त्याची माहिती जळगाव जामोद पोलिसांना दिली. त्यानंतर स्थानिक प्रशासन व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी विहिरीतून पाचही जणांचे मृतदेह बाहेर काढून पुढील सोपस्कारासाठी जळगाव जामोद ग्रामीण रुग्णालयात पाठवले. एकाच कुटुंबातील ५ जणांचा अशा पद्धतीने अंत झाल्यामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

# आचारसंहितेला हरताळ; भाजपच्या माजी तालुकाध्यक्षाची रेस्टहाऊसवर 'ओली' पार्टी

## कर्मचाऱ्यांनाहीअर्वाच्च भाषेत दमदाटी, तालुका अध्यक्ष यांच्यावर कारवाई कोण करणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

विधानपरिषदेची आचार संहिता सुरू असताना शनिवारी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तथा कॉन्ट्रॅक्टर यांनी मंत्रालयातून पीडब्ल्यूडी विभागाच्या ऑडीटसाठी आलेल्या दोन्ही अधिकाऱ्यांना बाहेर काढून बेकायदा ताबा मिळवित ओली पार्टी केल्याची घटना शनिवारी (दि.२३) रात्री तिवसा रेस्ट हाऊसवर घडली. इतक्यातच थांबले नाही तर थेट पत्रकारांसह तुम्ही कोणाला रूम देता असे म्हणत अर्वाच्च भाषेत कर्मचाऱ्यांना दमदाटी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तिवसा रेस्ट हाऊसच्या नवीन इमारतीच्या व्हीआयपी सूट मंत्रालयातील दोन अधिकाऱ्यांसाठी आरक्षित केल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार ३० मेपर्यंत हा सूट आरक्षित असताना, शनिवारी रात्री८ वाजताच्या दरम्यान माजी तालुका अध्यक्ष व कॉन्ट्रॅक्टर आपल्या १२ ते १५ कार्यकर्त्यांसह रेस्ट हाऊसवर आले.नेहमीच्या गरम मिजाजात व्हीआयपी सूटमध्ये बेकायदा घुसले. मात्र आधीच त्या व्हीआयपी सुटमध्ये दोन अधिकारी उपस्थित असल्याचे पाहून माजी अध्यक्ष साहेब भडकले.व्हीआयपी सूट पाहिजेच असे सांगत ऐनवेळी मंत्रालयातील अधिकाऱ्यांना दुसऱ्या रूममध्ये पाठवायला सांगितले.व्हीआयपी रूमचा ताबा घेत यांनी थेट ओली पार्टीचा आस्वाद घेतला. त्यानंतर झिंगलेल्या अवस्थेत यांनी थेट रेस्ट हाऊस कर्मचाऱ्यांना दमदाटी केली.



### विधानपरिषदेच्या आदर्श आचारसंहितेचा भंग

राज्यात सध्या विधानपरिषदेची आदर्श आचारसंहिता सुरू आहे. या काळात राजकीय नेत्यांना रेस्ट हाऊस दिले जात नाही. मात्र त्यानंतरही शनिवारी कॉन्ट्रॅक्टरांनी व्हीआयपी सूटचा बेकायदा वापर केला. धक्कादायक म्हणजे त्यामध्ये ओली पार्टी केली. त्यामुळे आचारसंहितेत भाजपचे कार्यकर्ते तथा कॉन्ट्रॅक्टर असलेल्यांना रेस्ट हाऊसची रूम कशी देण्यात आली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. यात आचारसंहितेचा भंग झाल्याने तिवसा तहसीलदार मयूर कळसे हे काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

# दर्यापुरातील इकरा शाळेत भीषण आग

## शैक्षणिक साहित्य जळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर :** जिल्ह्यातील दर्यापूर शहरातील जहानपूर रोड परिसरात असलेल्या इकरा शाळेत सोमवारी अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी मोठी गर्दी केली असून काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.आग लागल्यानंतर शाळेतील वर्गखोल्यांमध्ये ठेवण्यात आलेले



फर्निचर, शैक्षणिक साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे तसेच इतर वस्तू मोठ्या प्रमाणात जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आग वेगाने पसरत असल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली आणि अग्निशामक दलाला माहिती देण्यात आली.घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. आग विझविण्यासाठी काही काळ प्रयत्न सुरू होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठा अनर्थ टळल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.घटनेनंतर शाळा परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. पोलिस व प्रशासनाने परिसराची पाहणी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. संबंधित प्रशासनाकडून नुकसानीचा पंचनामा सुरू करण्यात आला असून आगीमागील नेमके कारण शोधण्यासाठी अधिक तपास सुरू आहे. या घटनेमुळे शाळा प्रशासनासह पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जनगणना कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे महिलेचा जीव वाचला

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

जनगणनेचे काम करत असताना प्रगणकांच्या सतर्कतेमुळे एका वृद्ध महिलेचा जीव वाचल्याची घटना वार्ड क्रमांक १९, सर्कल क्रमांक ३, ब्लॉक क्रमांक १५ येथे घडली.जनगणनेचे काम सुरू असताना ब्लॉक क्रमांक १५ च्या प्रगणक श्रीमती वैशाली प्रशांत नालसे या आपल्या कार्यासाठी संबंधित घरात पोहोचल्या. त्यांच्यासोबत ब्लॉक क्रमांक १६ चे प्रगणक श्री मनोज नेताजी वाकोडे तसेच सुपरवायझर केशव नरेंद्र पंचारिया हेही उपस्थित होते. घराचा दरवाजा ठोठावून व आवाज देऊनही कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. शेजाऱ्यांकडे चौकशी केली असता, त्या घरात वृद्ध आजी-आजोबा दोघेच राहत असून आजोबांची तब्येत नेहमीच खराब असते व आजी रोज सकाळी फिरायला जात असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे



सुरुवातीला ते बाहेर गेले असावेत असा अंदाज व्यक्त करण्यात आला.मात्र, प्रगणकांना घरातील लाईट व पंखे सुरू असल्याचे दिसून आले. संशय आल्याने त्यांनी घरात डोकावून पाहिले असता वृद्ध आजोबा जमिनीवर पडलेल्या अवस्थेत दिसले. त्यांच्या शेजारी आजीही बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या होत्या. घरातून दुर्गंधीही येत होती.यावेळी प्रगणकांनी तत्काळ शेजाऱ्यांना बोलावून घेतले तसेच जवळ राहणाऱ्या डॉक्टरांनाही घटनास्थळी पाचारण केले. डॉक्टरांनी तपासणी केली असता आजोबांचा दोन दिवसांपूर्वीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. त्यांना पाहून वृद्ध आजी बेशुद्ध पडल्या होत्या.त्यानंतर संबंधित महिलेला तातडीने झेनीत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या माहितीनुसार, महिलेची ऑक्सिजन लेव्हल व शरीरातील पाण्याची पातळी अत्यंत कमी झाली होती. थोडा जरी उशीर झाला असता तर त्यांचाही मृत्यू झाला असता, असे डॉक्टरांनी सांगितले.दरम्यान, संबंधित वृद्ध दाम्पत्याचा एक मुलगा परदेशात राहतो तर दुसरा नागपुरात वास्तव्यास आहे. या घटनेची माहिती दोन्ही मुलांना देण्यात आली. तसेच मृत वृद्धाच्या पार्थिवावर आज सकाळी अंतिम संस्कार करण्यात आले.जनगणना कर्मचाऱ्यांच्या सतर्कता, तत्परता आणि मानवतेच्या भावनेमुळे एका महिलेचा जीव वाचल्याने परिसरात त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# मजीप्राच्या भोंगळ कारभाराविरोधात नगरसेवक चंदू खेडकरांचा एल्गार

### भाग्योदय कॉलनीतील पाणीटंचाईवर नागरिकांचा मजीप्रा कार्यालयावर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती,** प्रभाग क्र. १ मधील भाग्योदय कॉलनी व कठोरा रोड परिसरात गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या तीव्र पाणीटंचाई विरोधात नगरसेवक चंद्रकांत (चंदूभाऊ) खेडकर यांच्या नेतृत्वात नागरिकांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालया वर भव्य मोर्चा काढला. महिलांचा मोठा सहभाग असलेल्या या आंदोलनात प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.



नागरिकांनी वारंवार निवेदने देऊनही पाणीपुरवठा सुरळीत करण्यात अपयश आल्याचा आरोप करत, वाल्व वेळेवर उघडले जात नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठीही त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले.यावेळी नगरसेवक चंदू खेडकर यांनी उपकार्यकारी अभियंत्यांना धारेवर धरत, तातडीने पाणी समस्या सोडवा, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला.सौ. अर्चना सोनवाल, सिंधुताई डाहाके, मिनल सोनवाल यांच्यासह अनेक महिलांनी निवेदनाद्वारे नियमित व पुरेशा पाणीपुरवठ्याची मागणी केली. आंदोलनानंतर मजीप्रा प्रशासनाने पाणीपुरवठा प्रणाली तातडीने दुरुस्त करून समस्या प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन दिले.

### सुधाकर भारसाकळे यांचा

# उद्याला दर्यापुरात कार्यकर्ता मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५ दर्यापूर**



दर्यापूर तालुकासह अंजनगाव तालुक्यातील कार्यकर्ते व समर्थकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारा सुधाकर पाटील भारसाकळे आयोजित कार्यकर्ता व संवाद मेळावा उद्या मंगळवार, दि.२६ मे रोजी सकाळी ११ वाजता माहेश्वरी भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात सुधाकर पाटील भारसाकळे हे समर्थक व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार असून, आगामी राजकीय व सामाजिक वाटचालीबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संवाद आहे.

राजकीय घडामोडींमध्ये कार्यकर्त्यांची मेळाव्यात तालुक्यातील बदलत्या भूमिका, जनसंपर्काची दिशा आणि पुढील भूमिका याबाबत मार्गदर्शन व विचारमंथन होणार आहे. दर्यापूर-अंजनगाव तालुक्यातील समर्थक व कार्यकर्त्यांमध्ये या मेळाव्याबाबत उत्सुकतेचे वातावरण असून, समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अनेकांच्या नजरा लागलेल्या या संवाद मेळाव्यातून पुढील दिशा स्पष्ट होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे तर या मेळाव्यामुळे मात्र काँग्रेस गटात चिंतेचे वातावरण आहे.

# डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे सिझोरियन केल्यानंतर महिलेचा मृत्यू

## डॉ. मंगला राठी विरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

गर्भवती महिलेचे सिझेरियनकेल्यानंतर अचानक तिची प्रकृती बिघडली. त्यानंतर डॉक्टराने रक्ताचे इन्फेक्शन झाल्याचे सांगून केलेले सिझेरियन पुन्हा ओपन करून महिलेच्या गर्भ पिशवीतून ३ लिटर रक्त काढले. तरीसुध्दा महिलेच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याचे लक्षात येताच नातेवाईकांनी तिला प्रथम इर्विन आणि नंतर रेडियन्ट रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान रात्री तिचा मृत्यू झाला. या घटनेत राजापेठ पोलिसानी २३ मे रोजी डॉक्टरविरुध्द गुन्हा दाखल केला.

डॉ मंगला राठी (रा. परतवाडा) असे गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टरचे नाव आहे. तर सुमय्या बानो अब्दुल कलाम (रा. ब्राम्हणवाडा थडी) असे मृत महिलेचे नाव आहे.सुमय्या बानोचा अब्दुल कलामसोबत विवाह झाला होता आणि त्यांना एक ३ वर्षाची मुलगी आहे. त्यानंतर सुमय्या परत गर्भवती राहिली तेव्हा प्रसुतीकरिता तिला तिचा भाऊ मोहम्मद इरफान मोहम्मद उस्मान (वय ३२ रा. चांदूरबाजार) याने परतवाडा येथील डॉ. मंगला राठी यांच्या रूग्णालयात १९ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल केले होते. दरम्यान सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास तिचे सिझेरियन करण्यात आले तेव्हा तिने एका बाळाला जन्म दिला. त्यानंतर रात्रीपासून तिच्या पोटात त्रास सुरु झाला. त्यामुळे डॉक्टरला सांगितले असता थोडा त्रास होणारच असे म्हणून डॉक्टर निघून गेल्या. त्यानंतर रात्री ११.३० नंतर डॉक्टरांनी सोमय्याची रक्ताची तपासणी केली आणि रक्तात इन्फेक्शन झाले असे सांगितले. त्यानंतर २२ फ ऋब्रुवारी रोजी सिझेरियन केलेले पुन्हा ओपन करून तिच्या गर्भ पिशवीमधून ३ लिटर रक्त काढले. परंतु तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याचे लक्षात येताच नातेवाईकांनी तत्काळ तिला जिल्हा सामान्य रुग्णालय व त्यानंतर रिम्स हॉस्पीटलमध्ये दाखल केले. परंतु उपचारादरम्यान मध्यरात्री सोमय्याचा मृत्यू झाला.

याबाबत राजापेठ पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मर्ग दाखल केला. त्यानंतर नातेवाईकांनी दुसऱ्या दिवशी अंत्यविधी आटोपल्यानंतर सोमय्याचा भाऊ मो. इरफान याने डॉक्टरविरुध्द राजापेठ पोलीस ठाण्यात आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे तक्रार नोंदविली. त्या आधारावर जिल्हा शल्य चिकित्सक यांनी एक समिती गठीत करून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी केली असता डॉ. मंगला राठी यांच्या हलगर्जीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याचे उघड होताच राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला

# अवकाळी वादळाचा कहर; झाड कोसळून गायीचा मृत्यू, दोन जनावरे जखमी

**दि.२५ तळेगाव तळेगाव ठाकूर,**

तळेगाव ठाकूर परिसरात सोमवारी दुपारी अचानक आलेल्या अवकाळी पावसासह जोरदार वादळाने मोठे नुकसान घडवून आणले. या नैसर्गिक आपत्तीत झाड कोसळून एका गायीचा मृत्यू झाला, तर दोन गायी गंभीर जखमी झाल्याची घटना मौजा तिवसा भाग २ येथे घडली. मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी उत्तमराव उमप यांच्या शेताजवळ असलेले सुमारे २० वर्षे जुने मुंगणाचे झाड दुपारी दोन वाजताच्या सुमारास आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे अचानक कोसळले. त्याचवेळी त्या ठिकाणावरून काही गायी जात होत्या. अचानक झाड अंगावर पडल्याने राजू शेंडे यांच्या गायीचा जागीच मृत्यू झाला. तर मारोती निमकर आणि दीपक भारती यांच्या गायी गंभीर जखमी झाल्या. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांनी झाडाच्या फांद्या हटवून जखमी गायींना बाहेर



काढले. त्यानंतर बंडीच्या सहाय्याने जनावरांना गावात आणण्यात आले. जखमी गायींवर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल माहुरे यांनी तातडीने उपचार केले.

दरम्यान, घटनेनंतर तलाठी तेजस्विनी केवटे आणि महसूल सेवक बाळू घुरडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या घटनेमुळे संबंधित पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. अवकाळी पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वाढोना रामनाथ येथे विहिरीच्या गाळावरून दोन गटांत तुफान राडा



## ४५ जणांवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती :**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोना रामनाथ येथे विहिरीतील गाळ रस्त्यावर टाकण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये मोठी हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या राड्यात दोन्ही गटांनी लाठ्या-काठ्यांसह एकमेकांवर हल्ला केल्याने गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वाढोना रामनाथ गावात प्रसिद्ध रामनाथ स्वामी मंदिर असून मंदिराजवळील विहिरीतील गाळ एका गटाने काढून तो रस्त्यावर टाकला होता. याला दुसऱ्या गटाने विरोध दर्शवत आक्षेप घेतला. किरकोळ वादातून सुरू झालेला हा संघर्ष काही वेळातच उग्र बनला आणि दोन्ही गट आमनेसामने आले. त्यानंतर गावात मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रामनाथ स्वामी मंदिराच्या ताब्यावरून यापूर्वीही गावात अनेकदा वाद निर्माण झाले होते. त्यातूनच या घटनेला अधिक गंभीर स्वरूप आल्याची चर्चा गावात सुरू आहे.घटनेची माहिती मिळताच मंगरूळ चव्हाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी दोन्ही गटातील एकूण ४५ जणांविरोधात गुन्हे दाखल केले असून संबंधितांची चौकशी सुरू आहे.

सध्या गावात तणावपूर्ण शांतता असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास मंगरूळ चव्हाळा पोलीस करीत आहेत.

# महावितरणच्या वीज खंडिती विरोधात ठाकरे गटाचा एल्गार

## मुख्यमंत्र्यांच्या प्रतिकात्मक बॅनरचे केले पूजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती :**

शहरात वारंवार होत असलेल्या वीज पुरवठा खंडितीच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने महावितरणच्या अधीक्षक अभियंता कार्यालयावर जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनविस यांच्या प्रतिकात्मक बॅनरचे पूजन करून सरकारच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध करण्यात आला. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी सरकार आणि महावितरण प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.शहरातील विविध भागात सातत्याने वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले असून, महावितरणकडून कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शिवसैनिकांनी अधीक्षक अभियंता कार्यालयात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला जाब विचारला.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख प्रदीप बाजड आणि उपनेते सुधीर सूर्यवंशी यांनी प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम दिला. शहरातील वीज समस्येचे काम तातडीने पूर्ण झाले नाही तर शिवसेना आणखी तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा त्यांनी दिला. आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# जिल्ह्यात २२० गावे पाणीटंचाईच्या छायेत

## नऊ गावांना २१ टँकरद्वारे होतोय पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

यंदाच्या भीषण उन्हाळ्यात मेळघाटात पाणी पेटले असून सद्य:स्थितीत चिखलदरा तालुक्यातील जवळपास २२० गावे पाणीटंचाईच्या कवेत आल्याचे वास्तव आहे. सध्या नऊ गावांना २१ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून येत्या काही दिवसांत टँकर अवलंबित्वाच्या गावांच्या संख्येत वाढ होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. नागरिकांना प्रामुख्याने महिलांना गावापासून लांब अंतरावरून पाणी आणावे लागत आहे.

अनेक गावांतील विहिरी आटल्या असून या विहिरींमध्ये सुद्धा टँकरने पाणी टाकून मग ते पाणी गावकऱ्यांना दिले जात आहे. मे महिन्याच्या अखेरीस पाणीटंचाईची तीव्रता अधिक वाढली आहे. विशेष म्हणजे मोथासारख्या गावात तर फेब्रुवारीतच विहिरी आटल्याने महिलांना रात्रभर पाण्यासाठी आपला नंबर येण्याची वाट पाहावी लागते, असे या गावातील नागरिकांचे म्हणणे आहे. दुसरीकडे पाणीटंचाई आराखड्यानुसार टंचाईग्रस्त भागात उपाययोजना केल्या जात असल्याचा दावा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून केल्या



### या गावात लागले टँकर

मोथा : तीन,
खडीमल : सहा,
गौलखेडा बाजार : दोन,
बहाद्दरपूर : एक, आकी : एक,
मेहरियम : दोन,
आलाडोह (शहापूर) : दोन,
आलाडोह : दोन,
गवळीढाणा : एक

जात आहे. जोरदार पाऊस पडेपर्यंत तरी मेळघाटवासीयांना पाण्याच्या दाहकतेचा अनुभव घ्यावा लागणार आहे. जलजीवन मिशनवर नागरिकांचा रोष मेळघाटमधील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. मात्र त्यामध्ये पाणीच नाही. अनेक ठिकाणी नळजोडणी अपूर्ण आहे, असा नागरिकांचा आरोप आहे. प्रशासनाच्या योजना कागदोपत्रीच असल्याचा आरोप होत आहे.

# आज पासून बारा हजारांवर प्रवाशांची लाइफलाइन असलेली सिटी बस सेवा बंद?

## कंत्राटदारमहेश साहू यांचा मुदतवाढ स्वीकारण्यास स्पष्ट नकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती –** बारा हजारांवर प्रवाशांची लाइफलाइन असलेल्या सिटीबसचे कंत्राट संपुष्टात येत असून पुढे ही सेवा चालविण्यास कंत्राटदाराने स्पष्ट नकार दिल्याने शहर बससेसची चाके थांबणार आहेत. त्यामुळे या सेवेचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांना दररोज त्यांच्या नियोजित स्थळी पोहोचण्यासाठी खिशावर ताण सहन करावा लागणार आहे.

तत्कालीन महापालिका आयुक्त कुंदन कौशिक यांनी पुढाकार घेत २००६ मध्ये शहर बससेवेची मुहूर्तमेढ रोवली होती. 'लोककल्याणकारी सेवा' या शीर्षाखाली त्यांनी ही सेवा खासगी तत्त्वावर प्रारंभ केली होती. तेव्हापासून 'आपली बस' ही सेवा शहरातील कष्टकरी, श्रमजीवी वर्गासह विद्यार्थी, नोकरदार व सामान्य नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरली आहे. या २० वर्षांत चार कंत्राटदार बदलण्यात आले असले तरी सेवा सुरू होती. महापालिकेस या माध्यमातून अल्प उत्पन्न मिळत असले तरी



लोककल्याणकारी सेवा, या शीर्षाखाली सेवा अविरत होती. आता मात्र ही सेवा खंडित होणार आहे. सद्यस्थितीत बारा बसेस शहरातील सहा मार्गांवर धावत असून दररोज बारा हजार प्रवासी या सेवेचा लाभ घेत आहेत.

विद्यमान स्थितीत साहू टूर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्स, या कंत्राटदार कंपनीचा कंत्राट २५ मे २०२६ ला संपुष्टात येत आहे. आपली बसचा कंत्राट संपुष्टात येत असल्याने महापालिकेसमोर ही सेवा पूर्ववत ठेवण्याचे आव्हान उभे ठाकले आहे. विद्यमान कंत्राटदारास मुदतवाढ देऊन बससेवा सुरू ठेवण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. मात्र कंत्राटदार महेश साहू यांनी ही सेवा सुरू ठेवण्यास आपण असमर्थ असल्याचे महापालिकेस कळविले आहे. ही सेवा चालविताना दरमहा सहा ते सात लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत असून आर्थिकदृष्ट्या ते परवडणारे नसल्याने मुदतवाढ स्वीकारण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला आहे. गेल्या वीस वर्षांपासून सुरू असलेल्या शहर बससेवेची चाके सोमवारनंतर बंद पडण्याची शक्यता कंत्राटदाराच्या नकाराने निर्माण झाली आहे. दरम्यान, महापालिका प्रशासनाने कंत्राटदाराने ऑक्टोबरपर्यंत सेवा सुरू ठेवावी, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

### सद्यस्थितीत फेऱ्या

बडनेरा ते नवसारी : ८
गोडे कॉलेज : ४
विद्यापीठ : ६
बीझीलँड : २
म्हाडा कॉलनी : ४
बस स्थानक : ८

### बससेवेचे मार्ग

शहर बससेवेसाठी महापालिका क्षेत्रातील १३ मार्ग निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी सद्यस्थितीत सात मार्ग सुरू आहेत. दरमहा १५ ते २० हजार किलो मीटर फेऱ्या प्रति महिना होतात.

# विजयासाठी वैध मतांच्या ५० टक्के प्लस एक मतांचा कोटा

## विधान परिषद निवडणुकीत 'पसंतीक्रम' पद्धतीची नव्या मतदारांमध्ये उत्सुकता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती** महाराष्ट्र विधान परिषद निवडणूक-२०२६ अंतर्गत होणाऱ्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीकडे यंदा राजकीय वर्तुळासह नव्या मतदारांचे विशेष लक्ष लागले आहे. या निवडणुकीत वापरली जाणारी 'पसंती क्रमांक' मतदान पद्धती आणि विजयासाठी आवश्यक असलेला वैध मतांच्या '५० टक्के प्लस एक' मतांचा कोटा यामुळे नवीन मतदारांमध्ये मोठी उत्सुकता निर्माणझाली आहे. या निवडणुकीत मतदारांना उमेदवारांचे पसंतीक्रम देण्याची सुविधा असते. मतदार आपल्या मतपत्रिकेवर पहिली, दुसरी, तिसरी अशा क्रमाने उमेदवारांची पसंती नोंदवू शकतात. त्यामुळे ही निवडणूक सर्वसाधारण मतदानापेक्षा वेगळी आणि अधिक रंजक मानली जाते. विजयासाठी उमेदवाराला वैध मतांच्या ५० टक्के अधिक एक मतांचा कोटा पूर्ण करावा लागतो. पहिल्या फेरीतील मतमोजणीत एखाद्या उमेदवाराला आवश्यक कोटा प्राप्त झाला तर त्याचा विजय निश्चित मात्र, कोणालाही आवश्यक मतांचा टप्पा गाठता आला नाही तर दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी केली जाते. त्यामुळे





प्रत्येक पसंतीक्रमाला या निवडणुकीत विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकीय जाणकारांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनेकदा दुसऱ्या पसंतीची मते निर्णायक ठरतात. त्यामुळे उमेदवारांकडून केवळ पहिल्या पसंतीपुरतेच नव्हे तर इतर उमेदवारांच्या समर्थकांशीहीसंपर्क वाढविण्यावर भर दिला जात आहे. यंदा प्रथमच मतदान करणारे महापालिकेचे अनेक नगरसेवक, नगरपंचायत व नगरपरिषदेच सदस्य याप्रक्रियेबाबत माहिती घेत असल्याचे चित्र आहे. विशेषतः 'एकच मत, पण अनेक पसंती' या पद्धतीमुळे मतमोजणीची उत्सुकता अधिक वाढली आहे. अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील ही निवडणूक केवळ राजकीय प्रतिष्ठेची नसून पसंतीक्रमाच्या गणितामुळे शेवटच्या फेरीपर्यंत रंगतदार ठरणार आहे.-

# जिल्ह्यात उष्माघाताचे आजवर १५ रुग्ण

## काही उपचार घेऊन बरे, सामान्य रुग्णालय प्रशासनाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५ अमरावती**

एप्रिलपासूनच सर्वत्र सूर्य आग ओकायला लागला. मे महिनाही आता संपत येत आहे. जिल्ह्यात तीव्र उष्णतेच्या लाटा वाहताहेत. जिल्ह्यात उष्माघात सदृश्य १५ रुग्ण दाखल झाले होते. त्यांच्यावर आवश्यक उपचार करून त्यांना सुटी देण्यात आली, अशी माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) प्रशासनाने दिली.सूर्य आग ओकत असल्याने खबरदारी म्हणून आरोग्य विभागाने जिल्ह्यात तालुकानिहाय उष्माघात कक्ष स्थापन केले आहेत. तापमानातील अपेक्षित वाढ पाहता उष्माघाताबाबत नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे. जिल्ह्यात उष्णतेची लाट कायम असून शहरासह ग्रामीण भागातही तिचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर नागरिकांची वर्दळ कमी झाली आहे. आवश्यक कामांशिवाय बाहेर पडणे टाळले जात आहे. मागील संपूर्ण एप्रिल महिना उष्णतेचा गेला. विक्रमी ४७ अंशाच्याही वर कमाल तापमानाची नोंद झाली आहे. या कालावधीत सुरुवातीला उष्माघाताचा एकही रुग्ण जिल्ह्यात आढळला नसल्याचे आरोग्य विभागाने सांगितले होते. त्यानंतर रुग्णांमध्ये वाढ झाली. सध्या मे महिना सुरू आहे. यामहिन्यात आणखी तापमानात वाढ झाली आहे. दिवसा तसेच रात्रीचे तापमानही लक्षणीयरित्या वाढले आहे. यामुळे नागरिकांना विविध आरय समस्यांना सामोरे जावे लागत आहे. परिणामी उष्माघा सदृश्य परिस्थिती निर्माण होत असल्याचे समोर येत आहे.दरम्यान, काही दिवसांपासून जिल्ह्यात कमाल तापमान ४७ अंश सेल्सिअ यंत नोंदविण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सुमारे १५ रुग्ण उष्माघात सदृश्य लक्षणांमुळे शासकीय उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. सर्व रुग्णांवर आवश्यक उपचार करून त्यांना सुटी देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने दिली. तसेच हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस उष्णतेची तीव्रता कायम राहण्याची शक्यताअसून, उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेऊन स्वतःचे व कुटुंबीयांचे आरोग्य सुरक्षित ठेवावे. चक्कर येणे, मळमळ, जास्त घाम येणे किंवा घाम बंद होणे, अशी उष्माघाताची लक्षणे असून, अशी लक्षणे दिसल्यास रुग्णालयात उपचार घेण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी केले आहे.




# खरीपासाठी १ लाख ३८ हजार मेट्रिक टन खत मंजूर

## कापसासाठी १२.५० लाख तर सोयाबीनसाठी ६५,३५० क्विंटल बियाण्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

खरीप हंगामासाठी कापूस, सोयाबीन, तूर, मका, मूग आणि उडीद या प्रमुख पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापसासाठी १२.५० लाख बियाणे पाकिटांची तर सोयाबीनसाठी ६५ हजार ३५० क्विंटल बियाण्यांची मागणी नोंदविण्यात आली आहे.

कृषी विभागाकडून खरीपाचे नियोजन करण्यात आले असून जिल्ह्यात यंदा ६ लाख ७७ हजार हेक्टरवर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रस्तावित क्षेत्रानूसार१ लाख ३८ हजार मेट्रिक टन खत मंजूर करण्यात आले आहे. त्यामध्ये युरिया, डीएपी, एसएसपी, एमओपी आणि संयुक्त खतांचा समावेश आहे.

१३ मेपर्यंत जिल्ह्यात ८५ हजार २६९ मेट्रिक टन खत उपलब्ध झाले असूनटंचाई टाळण्यासाठी कंपनीनिहाय आणि तालुकानिहाय नियोजन सुरू करण्यात आले आहे.

आगामी खरीप हंगाम २०२६-२७ लक्षात घेता जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाने व्यापक तयारी पूर्ण केली असून बियाणे, खतसाठा, सिंचन व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण आणि एलनिनोच्या संभाव्य धोक्याविरोधात विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यातीलसुमारे ४.५६



लाख शेतकऱ्यांसाठी विविध उपाययोजना राबविल्या जात असून खरीप हंगाम सुरळीत पार पडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

### खरीपात ५८,६२८ हेक्टर सिंचनाचे नियोजन

जिल्ह्यातील ७१ प्रकल्पांद्वारे १ लाख ९९ हजार १२२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून प्रत्यक्ष १ लाख ६७ हजार ७८० हेक्टर क्षमता उपलब्ध झाली आहे.

आगामी खरीप हंगामासाठी ५८ हजार ६२८ हेक्टर सिंचनाचे नियोजन करण्यात आले आहे. खरीप आणि रब्बी मिळून १ लाख ७ हजार ७२६ हेक्टर सिंचनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

### ६६१० मोहिमांद्वारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती

१० मेपर्यंत जिल्ह्यात तब्बल ६६१० विविध मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये एलनिनो जनजागृती, हवामान अनुकूल तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, माती परीक्षण, हुमणी कीड व्यवस्थापन, बोंडअळी नियंत्रण, जैविक शेती, शून्य मशागत, ट्रायकोकार्ड वापर आणि शिवार फेऱ्यांचा समावेश आहे. हुमणी कीड व्यवस्थापनासाठी ८७५ मोहिमा, हवामान अनुकूल तंत्रज्ञानासाठी १७८४ प्रात्यक्षिके आणि गावनिहाय प्रशिक्षणासाठी ६३८ मोहिमा घेण्यात आल्यात.